# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७२८ /२०२५

दि.०२/०७/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA अंतर्गत मे. Reliance Astaldi Joint Venture या कंपनी कडून मेट्रो ४ चे काम चालू असुन डोंगरीपाडा येथील स्टिल गर्डर हे मल्टीएक्सेल वाहनावर चढविताना जड अवजड वाहने मुख्य रस्त्यावरून एक लाईन विरुध्द दिशेने मार्गस्थ करावी करावी लागणार आहे. तसेच ठाणे घोडबंदर वाहिनीवरून विरूध्द दिशेने नळपाडा, कापुरबावडी येथे स्टिल गर्डरची वाहतूक करण्यासाठी पातलीपाडा व मानपाडा ब्रिजलगत स्लिप रोड काही वेळे करीता बंद करावा लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** ठाणे घोडबंदर वाहिनी वर डोंगरीपाडा येथे स्टिल गर्डर चढविताना घोडबंदर च्या दिशेने जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **पातलीपाडा ब्रिज उतणीच्या पुढे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाणे घोडबंदर वाहिनीवर डोंगरीपाडा येथे स्टिल गर्डर चढविताना सर्व प्रकारचे वाहने ही पातलीपाडा ब्रिज उतणीच्या पुढे ओपन केलेल्या मध्य दुभाजक कट मधुन रॉग साईडने जाऊन वाघबिळ ब्रिज पुर्वी ओपन केलेल्या कट मधुन जाउन पुढे मुख्य रस्त्यामार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद –** **२)** ठाणे घोडबंदर वाहिनी वरून रॉग साईडने स्टिल गर्डरची वाहतुक करतांना पातलीपाडा ब्रिजलगत स्लीप रोडने हिरानंदनी इस्टेट कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **पातलीपाडा ब्रिज चढणी जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाणे घोडबंदर वाहिनी वरून रॉग साईडने स्टिल गर्डरची वाहतुक करतांना हिरानंदनी इस्टेट कडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी पातलीपाडा ब्रिजवरून जाउन वाघबिळ ब्रिज खालुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **३)** ठाणे घोडबंदर वाहिनी वरून रॉग साईडने स्टिल गर्डरची वाहतुक करतांना मानपाडा ब्रिजलगत स्लीप रोडने मानपाडा ब्रिज खाली तसेच टिकुजीनीवाडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मानपाडा ब्रिज चढणी जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाणे घोडबंदर वाहिनी वरून रॉग साईडने स्टिल गर्डरची वाहतुक करतांना मानपाडा ब्रिज खाली जाणाऱ्या सर्व वाहनांनी पातलीपाडा ब्रिज खालुन तसेच टिकुजीनीवाडी कडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी मुल्ला बाग मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक ०३/०७/२०२५ रोजी ते दिनांक ०७/०७/२०२५ रोजी पावेतो रात्रौ २३:०० वा. ते सकाळी ०५:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर आयुक्तालय वाहतूक विभाग
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner